# श्रीराम भजन

श्रीराम जय राम जय जय राम
श्रीराम जय राम जय जय राम ॥ धृ ॥

जगी राम जनी राम, मनी राम देही राम
नयनी राम वाचे राम, हृदयी राम राजा राम ॥ १ ॥

निजता राम उठता राम, बसता राम चालता राम
प्रभाती राम रात्री राम, निद्रेत राम मुखी राम ॥ २ ॥

राम सगुण निर्गुण, राम बाहेर, राम आत
राम प्रेमळ माय-बाप, राम तारी; भव ताप ॥ ३ ॥

राम करुणेचा सागर, राम देहधारी ईश्वर
राम एक पुरुषोत्तम, रामनाम व्यवहार उत्तम ॥ ४ ॥

खावा राम प्यावा राम, गावा राम बोला राम
नसात राम श्वासात राम, व्हा रे, एकरूपी राम ॥ ५ ॥

जन्म राम जीवन राम, कर्ता राम धर्ता राम
प्रश्न राम उत्तर राम, पुण्य राम पावन राम ॥ ६ ॥

प्रपंची ठेवा राम, वेळीच ओळखा राम
सापडेल शोधा राम, भेटेल राम, राम राम ॥ ७ ॥

विचारी ठेवा राम, वर्तनी बाणा राम
तनमनात चेतवा राम, बोला राम, राम राम ॥ ८ ॥

सीताराम सीताराम, लक्ष्मणराम, भरतराम
हनुमत जीवन राम, सुग्रीव सखा राम
रामदास प्राण राम, श्रीराम श्रीराम ॥ ९ ॥

© www.saarthbodh.com

सचिन कुलकर्णी